राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
रासनिप्रा
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी -sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरू करणे/आदेश/ 6620 /सन २०२३. दिनांक 26 /१२/२०२३.

**निवडणूक महत्वाचे**
निवडणूक प्राधान्य

**वाचावे :-** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुद.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच)
३. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. २७२९/२०२१ दिनांक १३.९.२०२१
४. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. २९६९/२०२१ दिनांक ३०.९.२०२१
५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ४१६७/२०२१ दिनांक २६.११.२०२१
६. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. २६४७/२०२२ दिनांक २९.०३.२०२२
७. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १९९/२०२३ दिनांक ०९.०१.२०२३
८. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १२७६/२०२३ दिनांक १५.०२.२०२३

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) संचालन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाच्या सुचनेनुसार संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी संचालक मंडळ मुदत संपल्याचा दिनांक विचारात घेऊन, ३१ डिसेंबर २०२० अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचा समावेश असलेला सहा टप्प्यांचा "जिल्हा निवडणूक आराखडा" तयार केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ३ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने "जिल्हा निवडणूक आराखडयातील" पहिल्या टप्प्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ४ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने "जिल्हा निवडणूक आराखडयातील" दुसऱ्या टप्प्यातील सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ५ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने "जिल्हा निवडणूक आराखडयातील" तिसऱ्या टप्प्यातील दिनांक ०१.०१.२०२० ते ३१.३.२०२० या कालावधीतील निवडणूकीस पात्र कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांसह इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि चौथ्या, पाचव्या व सहाव्या टप्प्यातील, ई-१ सन २०२१ मधील व ई-१ सन २०२२ मधील दिनांक ०१.०१.२०२२ ते ३१.०३.२०२२ मधील निवडणूकीस पात्र सर्व कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ६ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने "जिल्हा निवडणूक आराखडयातील" चौथ्या, पाचव्या व सहाव्या टप्प्यातील कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था वगळता इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्था आणि ई-१ सन २०२१ मधील दिनांक ०१.०१.२०२१ ते ३१.०३.२०२१ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ७ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने ई-१ सन २०२२ मधील दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३१.१२.२०२२ या कालावधीतील निवडणूकीस पात्र कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, वाचावे क्र. ८ च्या आदेशानुसार प्राधिकरणाने ई-१ सन २०२१ मधील दिनांक ०१.०४.२०२१ ते दिनांक ३१.१२.२०२१, ई-१ सन २०२२ मधील दिनांक ०१.०१.२०२२ ते दिनांक ३१.१२.२०२२ आणि ई-१ सन २०२३ मधील दिनांक ०१.०१.२०२३ ते दिनांक ३१.१२.२०२३ या कालावधीतील निवडणूकीस पात्र कृषि पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था वगळता इतर सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेबाबत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील पहिल्या परंतुकानुसार अकल्पित परिस्थितीत किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सहकारी संस्थांच्या समितीची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेतल्या जाऊ शकत नाहीत अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत तात्पुरती मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (२) व नियम ९ (२) मधील तिसऱ्या परंतुकानुसार ज्या सहकारी संस्थेवर कलम ७७ - अ व कलम ७८ - अ अंतर्गत प्रशासक/ प्राधिकृत अधिकारी नियुक्त झालेला आहे अशा सहकारी संस्थांच्या बाबतीत तात्पुरती मतदार यादी प्राधिकरणाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकाच्या आधारे तयार करणे आवश्यक आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६ (३) व नियम ९ (३) मधील तरतुदीनुसार "अ" व "ब" प्रकारच्या संस्थेने समितीची मुदत संपण्यापुर्वीच्या दिनांकापूर्वी १५०/१२० दिवस अगोदर, "क" प्रकारच्या संस्थेने नियम ७५ (२) (क) प्रमाणे ६० दिवस अगोदर व "ड" प्रकारच्या संस्थेने नियम ७६ (१) अन्वये ६० दिवस अगोदर तात्पुरती मतदार यादी तयार करुन जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार निवडणूका सुरळीतपणे व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांशी सुसंगत आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, प्राधिकरण ई-१ सन २०२४ मधील दिनांक ०१.०१.२०२४ ते दिनांक ३१.१२.२०२४ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था, सर्व प्रशासक/प्रशासक मंडळ नियुक्त सहकारी संस्था, हंगामी समितीचा कालावधी संपुष्टात आलेल्या सहकारी संस्था यांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करणे बाबत पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच), नियम ६ व नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण ई-१ सन २०२४ मधील दिनांक ०१.०१.२०२४ ते दिनांक ३१.१२.२०२४ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था, सर्व प्रशासक/प्रशासक मंडळ नियुक्त सहकारी संस्था, हंगामी समितीचा कालावधी संपुष्टात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया खालील बाबींचे अनुपालन करून सुरु कराव्यात.

१. ई-१ सन २०२४ मधील दिनांक ०१.०१.२०२४ ते दिनांक ३१.१२.२०२४ या कालावधीतील निवडणूकीस पात्र सर्व प्रकारच्या सहकारी संस्था, सर्व प्रशासक/प्रशासक मंडळ नियुक्त सहकारी संस्था, हंगामी समितीचा कालावधी संपुष्टात आलेल्या सहकारी संस्था यांच्या निवडणूक प्रक्रिया **दिनांक ०१.०१.२०२४** पासून सुरू कराव्यात. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु न करणे बाबत मा. न्यायालयाचे अथवा इतर सक्षम प्राधिकाऱ्याचे विशिष्ट संस्थेबाबत आदेश असल्यास अशा संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात येऊ नये.

२. ई-१ सन २०२४ मधील दिनांक ०१.०१.२०२४ ते दिनांक ३१.१२.२०२४ या कालावधीतील निवडणूकीस पात्र अ, ब, क व ड वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया संचालक मंडळाची मुदत संपण्यापूर्वी अनुक्रमे १५०, १२०, ६० व ६० दिवस अगोदर सुरु कराव्यात. सदर संस्थांच्या मतदार यादया तयार करण्याकरीता संचालक मंडळाची मुदत संपल्याचा दिनांक हा अर्हता दिनांक म्हणून समजण्यात यावा.

३. प्रलंबित संघीय संस्थेच्या बाबतीत ठराव मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नसेल व इतर संस्थेच्या बाबतीत प्रारूप मतदार यादया प्रसिध्द करण्यात आलेली नसेल अशा सर्व प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता नव्याने प्रारूप मतदार यादी तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार अर्हता दिनांक बाबतचे प्रस्ताव कारणमिमांसा नमुद करून प्राधिकरणास सादर करावेत व प्राधिकरणाने अर्हता दिनांक दिल्यानंतर अशा संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु करावी.

४. ज्या क्रमाने संचालक मंडळाची मुदत संपलेली आहे त्याच कालानुक्रमाने सदर संस्थांच्या निवडणूका पार पाडण्याची कार्यवाही करावी.

५. ज्या संस्था निवडणुकीकरीता प्रारुप मतदार यादी सादर करणार नाहीत किंवा पुरेसा निवडणूक निधी उपलब्ध करणार नाहीत अशा संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ अंतर्गत कारवाई करावी. उदा. प्रारुप मतदार यादी तयार करण्याकरीता प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे, निवडणूक निधी जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुल करणे इत्यादी.

६. "अ" व "ब" वर्गातील सहकारी संस्थांची मतदार यादी व निवडणूक कार्यक्रमास जास्त खपाच्या एकाच स्थानिक वर्तमान पत्रात शासन मान्य दराने व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थेची मतदार यादी व निवडणूक कार्यक्रमास नियम १९ (४) मधील परंतुकानुसार प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच "अ", "ब", "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांच्या प्रारूप व अंतिम मतदार यादया आणि निवडणूक कार्यक्रम यांना प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

७. कोव्हीड-१९ व तदअनुषंगिक आजारांच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांचे व मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.

८. निवडणूकीस पात्र असणा-या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरीता आवश्यकतेनुसार शासनाच्या इतर विभागातील समकक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

९. "क" व "ड" वर्गातील संस्थांच्या निवडणूकांकरितां नामतालिकेमधील निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती प्राधान्याने करावी. असे अधिकारी उपलब्ध नसल्यास इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

१०. प्राधिकरणाकडून जिल्हानिहाय निवडणूक प्रशिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे नियंत्रणाखाली निवडणूक प्रयोजनार्थ नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाईल याची दक्षता घ्यावी.

११. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय क्षेत्रीय/जिल्हा स्तरावरील वरिष्ठ कार्यालय असून त्यांनी आपल्या विभागातील/जिल्हयातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीचे कार्यक्षम अधिक्षण, नियंत्रण व संचालन करणे आवश्यक आहे. तसेच या आदेशाचे काटेकोरपण पालन होईल हे लक्षपूर्वक पाहणे ही त्यांची वैयक्तिक पर्यवेक्षीय जबाबदारी असेल, याची नोंद घ्यावी.

१२. सहकारी संस्थांचे निवडणूक विषयक कामकाज वैधानिक स्वरूपाचे व संवेदनशील असल्याने त्यास प्रथम प्राधान्य देऊन निवडणूक कामकाजाचा दरमहा आढावा तालुका, जिल्हा व विभागीय अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर घ्यावा.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ सत्यमेव जयते

**(अशोक गाडे)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत:-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना :-**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. आयुक्त (दुग्ध), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा. आयुक्त (मत्स्य), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. मा. आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. मा. आयुक्त (वस्त्रोदयोग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२/- या सर्वांना कळविण्यात येते की, त्यांनी "निवडणूक" या विषयाचा आढावा त्यांचेस्तरावर दर महिन्याच्या बैठकीत प्राधान्याने घ्यावा.

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव (पणन) सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.